## फौजदारी कि. अर्ज क्र.५३०/२०२२ मधील नि. १ खालील आदेश

**CNR NO. :MHST-1400-2394-2022**

१. सदरचा अर्ज अर्जदार मोहन गोपाळ धाईजे यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४५७ अन्वये Honda Motorcycle and Scooter I कंपनीची C B Unicorn ही मोटरसायकल त्याचा रजि. नंबर एम.एच.११.सी.पी.२८१५ चेसिस नं. ME4KC311EJ8296082 व इंजीन नंबर KC31E80295908 ही फलटण ग्रामीण पोलीस ठाणे यांनी गुन्हा रजि. नं.५८५/२०२२ हे भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये मध्ये जप्त केली आहे ती ताब्यात मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

२. अर्जदारचे थोडक्यात कथन असे की, अर्जदार हा सदरचे वाहनाचा वापर हा त्याचे शेतीव्यवसायासाठी दैनंदीन गरजा तसेच व्यवसायाकरीता करीत असतो. सदरचे वाहन फलटण ग्रामीण पोलीस ठाणे यांनी पोलीस स्टेशनचे आवारात उघडयावर ठेवले असलेने त्याचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, अर्जदार यांनी मोटरसायकल एम.एच.११.सी.पी.२८१५ ही परत मिळावे अशी विनंती केली आहे.

३. सदरचे वाहन परत देणेविषयी तपासी अंमलदार यांचे म्हणणे मागितले असता त्यांनी म्हणणे दाखल केले आहे की, सदरचे वाहन अर्जदार नामे याचे ताब्यात दिल्यास आरोपी पुन्हा एखादा अशाच प्रकारचा गंभीर स्वरुपाचा गुन्हा करण्याची शक्यता नाकारता येत नाही तरी सदर वाहन परत देण्यात येवु नये अशी विनंती केली आहे. सरकारी वकिलांचे म्हणणे मागितले असता त्यांनी सदरील वाहनाची मुळ कागदपत्रे पाहून नियम व अटीवर वाहन सोडावे अशी विनंती केली आहे.

४. अर्ज व म्हणणे पडताळले. सदरचे वाहन फलटण ग्रामीण पोलीस ठाणे यांनी भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये मध्ये जप्त केली आहे. ते पोलीस ठाणेत उघडयावर ठेवल्यास त्याचे नुकसान होणार आहे यात शंका नाही. अर्जदाराने त्याच्या अर्जातील कथनाच्या पुष्ठयर्थ नि.४ लगत कागदपत्रांचे प्रमाणित प्रत दाखल केले आहेत. एफ.आय.आर.ची प्रत नि.४/१, अर्जदारच्या आधारकार्डची प्रत (४/२), अर्जदाराच्या गाडीचे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने निर्गमीत केलेले वाहनाचे नोंदणीकृत प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत (नि४/३) तसेच अर्जदाराचे अर्जासोबतचे शपथपत्र. सदर दाखल कागदपत्रामध्ये नमुद केलेल्या मुद्देमालाचे वर्णन याकामी जप्त असणा–या मुद्देमालाप्रमाणे असल्याचे दिसुन येते. यावरुन उपरोक्त वाहन अर्जदारचे असल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येते. सदरचे वाहन हे जास्त काळ पडुन राहिल्यास त्याचे इंजिन व्यवस्थेमध्ये खराब होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर वाहन योग्य स्थितीत राहण्यासाठी अर्जदाराला उपरोक्त

वाहनाचा ताबा मिळण्याचा अधिकार आहे. अभिलेखावरील दाखल दस्तऐवजावरुन अर्जदार हा जप्त मुद्देमालाचा प्रथमदर्शनी मालक आहे असे दिसुन येते. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद पाहता उपरोक्त उल्लेखीत कागदपत्र व अर्जदाराने त्याच्या अर्जात शपथेवर केलेल्या कथनांचा अवलोकन केले असता उपरोक्त उल्लेखित वाहन खालील अटी शर्तीवर सोडणे न्यायोचित वाटते. सबब मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्जदारचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदाराने रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार) मात्रचे सुपुर्तनामा बंधनपत्र हे फलटण न्यायालयात दाखल केल्यास अपराध क्र.५८५/२२ मध्ये जप्त असलेले Honda Motorcycle and Scooter I कंपनीची C B Unicorn ही मोटरसायकल त्याचा रजि. नंबर एम.एच.११.सी.पी.२८१५ ME4KC311EJ8296082 व इंजीन नंबर KC31E80295908 हे अर्जदार **<u>मोहन गोपाळ धाईजे</u>** यांच्या ताब्यात देण्यात यावे.

३. अर्जदार यानी सदरचे वाहनामध्ये कोणताही बदल करु नये. तसेच खटल्याचा निकाल लागेपर्यत विल्हेवाट लावु नये, गहाण ठेवु नये किंवा विकु नये.

४. पोलीस स्टेशन अधिकारी फलटण ग्रामीण यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त उल्लेखित वाहनाचे चारीही बाजुचे छायाचित्र अर्जदाराच्या खर्चाने काढुन ते दोषारोपपत्रासोबत योग्य त्या पुर्ततेसह न चुकता न्यायालयात दाखल करावे.

५. अर्जदार यांनी सदरचे वाहन मे. कोर्ट ज्या ज्या वेळी कोर्टात हजर करणेचे आदेश करतील त्या त्या वेळी ते हजर करण्याची हमी दयावी.

६. अर्जदाराने अटींचा भंग केल्याचे आढळुन आल्यास अर्जदाराने भरुन दिलेला सुपुर्तनामा बंधनपत्राचे रक्कम रु.५०,०००/- (रु.पन्नास हजार) भरुन देण्याची हमी दयावी.

७. पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन फलटण ग्रामीण यांना आदेशीत करण्यात येते की त्यांनी सदर गुन्हयातील मुद्देमालाचे अर्जदारला ताब्यात दिल्याबाबतची छायाचित्र हे दोषारोपपत्र दाखल करतेवेळी सोबत जोडावेत.

फलटण. (श्री. पी. एच.पाटील)

**ता.१५/१०/२०२२.** **३रे प्रथमवर्ग न्यायदडाधीकारी फलटण.**